# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात

शैक्षणिक वर्ष **२०२६-२७** पासून **New College Permission System (NCPS)** या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम/ विषय, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation→ Affiliation T-2 'Information Lists' या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदुची यादी, तसेच सदरचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ या ऑनलाईन प्रणालीमार्फत संस्थेने / महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र ठेवण्यात आलेले आहे.

**त्यास अनुसरून शासन मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या वार्षिक बृहत आराखड्यानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये यांनी दि.३०.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फतच विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.**

**तसेच नवीन विधी महाविद्यालय सुरु करण्याबाबत बार कौन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) सादर करणाऱ्या संस्थांनीच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (३) (ग) नुसार ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.**

**उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

**टिप :- वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठी निश्चित केलेल्या बिंदूनुसारच संस्था/महाविद्यालयांनी ऑनलाईन (Online) अर्ज भरावेत. सम्यक योजनेच्या बाहेरील बिंदू / ठिकाणासाठी केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

क्र.शिवाजी वि/संलग्नता/टी-२/६३२ सही/-
दिनांक:२१/०९/२०२५ कुलसचिव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये (कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हे) शैक्षणिक वर्ष **२०२६-२७** पासून **New College Permission System (NCPS)** या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम/ विषय, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत इच्छुक शिक्षण संस्थांना व संलग्नीत महविद्यालयांना कळविण्यात येते की -

१. शैक्षणिक वर्ष **२०२६-२७** पासून **New College Permission System (NCPS)** या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम/विषय, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation → Affiliation T-2 'Information Lists' या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदुची यादी, तसेच सदरचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ या ऑनलाईन प्रणालीमार्फत संस्थेने / महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र ठेवण्यात आलेले आहे.

२. जी संलग्नीत महाविद्यालये / संस्था सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम/ विषय, नवीन विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी इ. सुरू करू इच्छितात, अशा संलग्नीत महाविद्यालयांनी / संस्थांनी सदरचे प्रस्ताव बृहत आराखड्यामधील तरतुदीनुसार प्रस्तावित ठिकाणांसाठी शासनाच्या **New College Permission System (NCPS)** या ऑनलाईन प्रणालीमार्फत विद्यापीठाच्या विहित शुल्कासह आणि आवश्यक कागदपत्रांसह **कार्यालयीन वेळेत ३० सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वीच** उपरोक्त मुद्दा क्र. १ मध्ये दिलेल्या शासन पत्रामधील लिंकअन्वये विद्यापीठास ऑनलाईन (Online) स्वरूपात सादर करावेत.

३. बृहत आराखडा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation.→Affiliation T-2'Information Lists' या लिंकवर उपलब्ध आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०९ नुसार बृहत आराखड्यामधील तरतुदीप्रमाणेच प्रस्ताव स्विकारले जातील.

४. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन (पारंपारिक व विधी) महाविद्यालयांना **नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS - New College Permission System)** व्दारे मंजुरी मिळण्यासाठी शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ई-८४०७८३/मशि-४, दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या या शासन निर्णयामध्ये कार्यपध्दती व निकष नमूद करण्यात आलेले आहेत.

५. तसेच सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना **नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS - New College Permission System)** व्दारे मंजुरी मिळण्यासाठी शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या या शासन निर्णयामध्ये कार्यपध्दती व निकष नमूद करण्यात आलेले आहेत.

६. नवीन विधी महाविद्यालय सुरु करण्याबाबत बार कौन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) सादर करणाऱ्या संस्थांनीच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०९ (३) (ग) नुसार प्रस्ताव सादर करावेत.

**७. नवीन महाविद्यालयांचे प्रस्तावाचे शुल्क विद्यापीठाच्या ऑन लाईन गेट-वे पेंमेंटद्वारे A.2.R.1 या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली भरण्यात यावे.**

**८. महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बाबतच्या प्रस्तावाचे शुल्क विद्यापीठाच्या ऑनलाईन रिसिप्टमध्ये A.2.R.1.6 या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली भरण्यात यावे.**

**९. उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.**

**१०. वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठी निश्चित केलेल्या बिंदूनुसारच संस्था/महाविद्यालयांनी ऑनलाईन (Online) अर्ज भरावेत. सम्यक योजनेच्या बाहेरील बिंदू / ठिकाणासाठी केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

**११. दोन महाविद्यालयातील अंतराबाबत डॉ. नरेंद्र जाधव या समितीचे निकष लागू राहतील.**

**क्र.शिवाजी वि/संलग्नता/टी-२/६३२**
**दिनांक : २१/०९/२०२५**

**सही/-**
**डॉ. व्ही. एन. शिंदे,**
**कुलसचिव,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन (पारंपारिक व विधी) महाविद्यालयांना "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" (NCPS - New College Permission System) द्वारे मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/ ई - ८४०७८३/मशि-४.**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५.**

**संदर्भ** :-१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/ मशि-४, दिनांक १५.०९.२०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारीक व व्यावसायिक) मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णय दिनांक १५.०९.२०१७ अन्वये विहित करण्यात आले होते. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.७ व ३.३ मध्ये विद्यापीठांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज स्विकारण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार राज्यातील १२ अकृषी विद्यापीठांपैकी काही विद्यापीठांमध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मंजूर करणे व अंतिम मान्यता देण्यासाठी अर्ज स्विकारण्याबाबत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. परंतु, सदर विद्यापीठांमार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये एकसुत्रता दिसून येत नसल्याने, शासन स्तरावर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन (पारंपारिक व विधी) महाविद्यालयांना इरादापत्र व अंतिम मान्यता प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी " नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" (NCPS-New College Permission System) विकसित करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १५.०९.२०१७ मधील कार्यपद्धती व निकषांव्यतिरिक्त काही बाबी नव्याने समाविष्ट करण्यात आल्या असल्याने, नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व विधी) इरादापत्र व अंतिम मान्यता प्रदान करण्यासाठी सुधारित कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय:-**

१. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारिक व विधी) सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (इरादापत्राकरिता)**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०७ मधील तरतुदीनूसार प्रत्येक पाच वर्षांनी एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन महाविद्यालयांच्या (पारंपारिक व विधी) (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले अभ्यासक्रम सोडून) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी सम्यक योजनेतील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. सम्यक योजनेच्या बाहेरील ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या इच्छूक संस्थांनी **"नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS)"** या ऑनलाईन प्रणालीद्वारे "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाकडे, ज्यावर्षी इरादापत्र मागविले असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. सदर प्रणालीमध्ये नमूद केलेली तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेली कागदपत्रे प्रणालीद्वारे सादर करण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS)" या ऑनलाईन प्रणालीद्वारेच विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता विद्यापीठांचे कुलगुरु आवश्यक तेवढ्या छाननी समित्या नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी, सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद करण्यात आलेल्या तसेच प्रणालीमध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन, छाननी समिती त्यांचा अहवाल योग्य शिफारशीसह कुलगुरुंना सादर करेल.

१.१० संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस/अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटी पूर्ततेसंबंधीच्या कागदपत्रांची छाननी समितीकडून तपासणी करण्यात येईल.

१.१३ प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करणे तसेच आवश्यक तपासणी करण्याकरिता कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ञ समित्या गठित करतील. सदर तज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. अशी तज्ञ समिती गठित केल्यास ही समिती त्यांचा अहवाल योग्य शिफारशीसह अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ विद्यापीठामार्फत वरील सर्व कार्यवाही NCPS प्रणालीमार्फतच करण्यात येईल.

१.१६ अपात्र ठरविण्यात आलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे ऑफलाईन पध्दतीने अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर कुलगुरु निर्णय देतील. सदर निर्णय **"नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" वर विद्यापीठामार्फत अपलोड करण्यात येईल.**

१.१७ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या योग्य शिफारशीसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी **प्रणालीमार्फत** सादर करण्यात येतील.

१.१८ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावर छाननीअंती अंतिम पात्र ठरलेल्या प्रस्तावासंदर्भात शासनाकडून लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादापत्र देण्यात येईल.

१.१९ येथे स्पष्ट करण्यात येते की, इच्छुक संस्थांनी विद्यापीठाला प्रस्ताव सादर करणे व विद्यापीठांनी सदर प्रस्ताव छाननीअंती शासनास सादर करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये जो कालमर्यादेचा दिनांक नमूद केला आहे, त्या दिनांकास सार्वजनिक/ स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीचा दिनांक हा अंतिम दिनांक असेल.

१.२० वरील परि. १.८ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१३ मध्ये विहित केलेली तज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व विधी) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात कार्यवाही होईल याची खातरजमा करतील.

२. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारिक व विधी) सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (इरादापत्र)**

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९(२) नुसार, कलम १०७ अन्वये तयार केलेल्या सम्यक योजनेशी सुसंगत नसेल, असे उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

२.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९(३)(ख) नुसार विहित कालावधीत प्राप्त होतील, केवळ असेच अर्ज विद्यापीठाकडून प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील आणि विचारात घेण्यात येतील.

२.३ ज्या संस्थांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

अ) ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यासहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार भौतिक सुविधा उपलब्ध नसतील तर,

ब) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींचे तसेच, यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-"अ" मधील तसेच प्रणालीत नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करत नसतील तर,

क) मूल्यांकन/ पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्या बाबतीत एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसेल तर,

२.४ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२.५ सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहीत अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टिने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. त्यामुळे असे इरादापत्र देण्यात आले तरी संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

२.६ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल अंतिम मान्यता मिळण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह संस्थेने ३१ जानेवारीपर्यंत प्रणालीद्वारे विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

२.७ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (च) अंतर्गत परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे खंड (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादापत्रातील शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करेल तर, इरादापत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. परंतु तसेच, अपवादात्मक प्रकरणात आणि कारणे लेखी नमुद करुन राज्य शासन, विद्यापीठाने योग्यरित्या प्रक्रिया केलेल्या व्यवस्थापनाच्या अर्जावर वेळोवेळी, इरादापत्राची वैधता एकूण १२ महिन्यापेक्षा जास्त नसेल, अशा आणखी कालावधीसाठी वाढवू शकेल. मात्र याकरिता विनिर्दिष्ट कालमर्यादा संपण्यापूर्वी संस्थेने पूर्ण समर्थनासह विद्यापीठामार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

**३.** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :- (अंतिम मान्यता)**

३.१ शासनाकडून नवीन महाविद्यालय (पारंपारिक व विधी) सुरु करण्याकरिता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन त्याबाबतच्या अनुपालन अहवालासह नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता मागणारा अर्ज संस्थेने आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत प्रणालीद्वारे विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

३.२ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता मागणाऱ्या इच्छूक संस्थांनी इरादापत्रातील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचा अनुपालन अहवाल संबंधित विद्यापीठाकडे दाखल करावा. त्यासोबत परिशिष्ट "ब" मध्ये तसेच प्रणालीमध्ये नमुद केलेली कागदपत्रे सादर करण्यात यावीत .

३.३ संस्थेने अनुपालन अहवाल तसेच त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे विद्यापीठाकडे प्रणालीद्वारेच सादर करावीत

३.४ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता विद्यापीठांचे कुलगुरु आवश्यक तेवढ्या छाननी समित्या नियुक्त करतील.

३.५ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी, सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या तसेच प्रणालीमध्ये नमूद कागदपत्रांच्या सूचीनुसार करून छाननी समिती त्यांचा अहवाल योग्य शिफारशींसह कुलगुरुंना सादर करतील.

३.६ संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

३.७ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३.८ त्रुटी पूर्ततेसंबंधीच्या कागदपत्रांची छाननी समितीकडून छाननी करण्यात येईल.

३.९ प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करणे तसेच आवश्यक तपासणी करण्याकरिता संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ञ समित्या गठित करतील. सदर तज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये विहित करण्यात आलेल्या सुचीनुसार तसेच प्रणालीमध्ये नमूद केल्यानुसार, इरादापत्रामधील अटी व शर्तींची पूर्तता होत आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल व्हिडिओ छायाचित्रणासह अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल. विहित केलेले निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थेच्या प्रस्तावाची शिफारस विद्यापीठाने शासनास करू नये.

३.१० कुलगुरुंकडून संबंधित संस्थांना पात्रता व अपात्रता ऑफलाईन पध्दतीने कळविण्यात येईल.

३.११ विद्यापीठामार्फत वरील सर्व कार्यवाही प्रणालीमार्फतच करण्यात येईल.

३.१२ अपात्र ठरविण्यात आलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे ऑफलाईन पध्दतीने अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु निर्णय देतील.

३.१३ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज व त्यासोबतचा अनुपालन अहवाल मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "ब" मध्ये व प्रणालीमध्ये नमूद सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी प्रणालीद्वारे सादर करण्यात येतील.

३.१४ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासनाकडून १५ जूनपर्यंत अंतिम मान्यता कळविण्यात येईल.

३.१५ येथें स्पष्ट करण्यात येते की, इच्छुक संस्थांनी विद्यापीठाला प्रस्ताव सादर करणे व विद्यापीठांनी सदर प्रस्ताव छाननीअंती शासनास सादर करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये जो कालमर्यादेचा दिनांक नमूद केला आहे, त्या दिनांकास सार्वजनिक/ स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीचा दिनांक हा अंतिम दिनांक असेल.

३.१६ वरील परि. ३.४ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. ३.९ मध्ये विहित केलेली तज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व विधी) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात कार्यवाही होईल याची खातरजमा करतील.

४. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पुर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (अंतिम मान्यता)**

४.१ नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता इरादापत्र दिलेल्या ज्या महाविद्यालयांनी इरादापत्रामधील अटी व शर्तीची तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता करुन अनुपालन अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे, अशा प्रस्तावांची शिफारस विद्यापीठाने प्रणालीमार्फत शासनाकडे करावी.

४.२ विद्यापीठांनी अनुपालन अहवाल स्वीकारताना व शिफारस करताना या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व सोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" मधील तसेच प्रणालीमध्ये नमूद निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करावी.

५. परिशिष्ट "ब" मधील अनुक्रमांक ७ (अ) व ७ (ब) साठी परिशिष्ट "क" मध्ये दर्शविण्यात आलेले कक्षनिहाय आवश्यक क्षेत्रफळ विचारात घेण्यात यावे. यानुसार सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध असणे तसेच, मागणी करण्यात आलेल्या विद्याशाखानिहाय विहित केलेल्या निकषांनुसार बांधकाम पूर्ण असणे आवश्यक राहील.

६. शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणारे प्रस्ताव विद्यापीठांनी शिफारशीत करु नयेत. विद्यापीठांनी सकारात्मक शिफारस करुनही अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यामुळे निकषांची व सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारेच प्रस्ताव शिफारशीत होतील, याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. अशी पूर्तता न करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

७. नवीन महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी मान्यता ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

८. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालये त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१८१२०३०८४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.18 12:05:40 +05'30'

**(अशोक मांडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
९. सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
१०. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई,
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१३. महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१४.सर्व सहसचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१६. कार्यासन अधिकारी (विशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७.निवड नस्ती (मशि-४).

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - ८४०७८३/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट-अ"

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची |
|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेचा तपशील |
| २. | नवीन महाविद्यालयाकरिता अर्ज करण्यासाठी संस्थेने अर्जदारास प्राधिकृत केल्याबाबतचे प्रमाणपत्र व अर्जदाराचा तपशील |
| ३. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| ४. | संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबीसंबंधी नमूद तरतुदीबाबतची कागदपत्रे. |
| ५. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेची सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/ पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/ एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. |
| ६. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंबंधी संस्थेच्या ठरावाची प्रत. |
| ७. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची साक्षांकित प्रत. |
| ८. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाच्या सनदी लेखापाल (Charted Accountant) यांनी प्रमाणित केलेल्या प्रती. |
| ९. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत/ शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. (संस्थेचे नाव, बँकेचे नाव व बँकेचा IFSC कोड दर्शवणारे कागदपत्र. उदा. बँक बॅलन्स स्टेटमेंट, पासबुकचे प्रथम पृष्ठ व अंतिम पृष्ठ) |
| १०. | प्रस्ताव ज्या शैक्षणिक वर्षासाठी दाखल केला आहे, त्या शैक्षणिक वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष मुदतीच्या मुदत ठेव पावतीची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br><br>अ) विधी महाविद्यालय : रु. १५.०० लाख<br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु. ७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) |
| ११. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. |
| १२. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, मंजुर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु ५००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. |
| १३. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय/शाळा अस्तित्वात असेल तर, कनिष्ठ महाविद्यालय/ शाळेच्या अस्तित्वात असलेल्या इमारतीचा वापर प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र सादर करावे. सदर हमीपत्रामध्ये कनिष्ठ महाविद्यालय/ शाळेच्या अस्तित्वात असलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ नमूद करावे. |
| १४. | संस्थेच्या एकाच शैक्षणिक संकुलामध्ये नवीन प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय/ शाळा असेल तर, त्याच शैक्षणिक संकुलामधील कनिष्ठ महाविद्यालय/शाळा/अन्य वरिष्ठ महाविद्यालय यांकरिता विहित राखीव क्षेत्रफळ असलेबाबतची माहिती |

| | |
|---|---|
| १५. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>अ) मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत,<br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत,<br>याबाबत संस्थेने सादर केलेले आणि संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| १६. | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेल्या बिंदूच्या ठिकाणी संस्थेच्या नावे जागा असल्यास संस्थेच्या नावावरील किंवा जागा भाडेतत्त्वावरील असल्यास जागेच्या मालकाच्या नावावरील ७/१२, मालमत्ता पत्रक संदर्भातील कागदपत्रे:-**<br><br>१. प्रस्तावित महाविद्यालयाकरिता दर्शविलेली जागा कोणत्या क्षेत्रात आहे, त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (महानगरपालिका- क्षेत्रासाठी सहाय्यक आयुक्त/वॉर्ड ऑफिसर; नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या क्षेत्रासाठी मुख्याधिकारी; ग्रामपंचायत क्षेत्रासाठी ग्रामसेवक)<br><br>**२.१ स्वत:ची जागा -**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ड)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br><br>**२.२ भाड्याची जागा - (किमान ५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ड)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. |

| | |
|---|---|
| | **इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>उपरोक्त "अ","ब","क","ड" मधील नोंदणीकृत कराराच्या अनुषंगाने भाडेकरारातील जमीन ही भाडेकरार करणाऱ्या जमीन मालकाच्या नावावर असल्याचे प्रमाणित कागदपत्र उदा. गाव नमुना नं. ७/१२ अथवा मालमत्ता पत्रक |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला व सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेला नकाशा. |
| १८. | इरादापत्राकरीता दर्शविलेल्या जागेसंदर्भात तसेच अन्य कोणत्याही प्रकरणी संस्थेमध्ये अंतर्गत व बाह्य कसल्याही प्रकारचा वाद-विवाद, भांडण-तंटे, तक्रारी व न्यायालयीन प्रकरणे सद्यस्थितीत चालू किंवा प्रलंबित नसल्याबाबतचे संस्थेचे हमीपत्र. |
| १९. | इरादापत्र ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तीची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत करण्यात येईल आणि जर अशा अटी व शर्तीची पूर्तता ३१ जानेवारीपर्यंत झाली नाही तर इरादापत्र व्यपगत होईल याची पूर्वकल्पना असल्याचे संस्थेचे हमीपत्र. |
| २०. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. |
| २१. | प्रस्तावित महाविद्यालयाकरिता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन |
| २२. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. |

*** संस्थेने द्यावयाचे सर्व हमीपत्र व साक्षांकित प्रती संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीने द्याव्यात.**

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.18 12:05:53 +05'30'

**( अशोक मांडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - ८४०७८३/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट-ब"

| अ.क्र. | **नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची** |
|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने मंजूर केलेल्या इरादापत्राबाबतचा शासन निर्णय |
| २. | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता झाली असल्याचे संस्थेने दिलेले हमीपत्र |
| ३. | संस्थेच्या चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची साक्षांकित प्रत. |
| ४. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची सनदी लेखापाल (Charted Accountant) यांनी प्रमाणित केलेली प्रत. |
| ५. | इरादापत्र देण्यासाठी जे जमिनीचे निकष विहित केले आहेत ती जमीन (संस्थेची स्वतःची किंवा भाडेतत्त्वावरील) अकृषक असल्यासंदर्भातील महसूल विभागाचे आदेश/ गावठाण जमिनीसंदर्भात महसूल व वनविभागाच्या दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार अकृषक सनद. |
| ६. | **इरादापत्राकरिता दर्शविलेली जागा संस्थेच्या नावे असल्यास संस्थेच्या नावावरील किंवा जागा भाडेतत्त्वावरील असल्यास जागेच्या मालकाच्या नावावरील ७/१२, मालमत्ता पत्रक संदर्भातील कागदपत्रे:-**<br>१. प्रस्तावित महाविद्यालयाकरिता दर्शविलेली जागा कोणत्या क्षेत्रात आहे, त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (महानगरपालिका क्षेत्रासाठी सहाय्यक आयुक्त/वॉर्ड ऑफिसर; नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या क्षेत्रासाठी मुख्याधिकारी; ग्रामपंचायत क्षेत्रासाठी ग्रामसेवक)<br>**२.१ स्वत:ची जागा -**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ड)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**ई)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)<br>**२.२ भाड्याची जागा - (किमान ५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>**अ)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा अकृषक संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. |

| | |
|---|---|
| | **ब)** "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**क)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**ड)** "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>**इ)** उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>उपरोक्त "अ","ब","क","ड" मधील नोंदणीकृत कराराच्या अनुषंगाने भाडेकरारातील जमीन ही भाडेकरार करणाऱ्या जमीन मालकाच्या नावावर असल्याचे प्रमाणित कागदपत्र उदा. गाव नमुना नं ७/१२ अथवा मालमत्ता पत्रक. |
| ७. | **प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीचा तपशील-**<br>१. प्रस्तावित महाविद्यालयाची इमारत (संस्थेची/ भाडेतत्त्वावरील)- संबंधित स्थानिक स्वराज संस्था किंवा अन्य संबंधित प्राधिकरणाचे इमारत बांधकाम पुर्णत्वाबाबतचे प्रमाणपत्र, ज्यामध्ये इमारतीचे क्षेत्रफळ चौ.फु./चौ.मी., गट/सर्वे नंबर आणि ज्या भागातील इमारत आहे त्याबाबतचा तपशील नमूद असणे अनिवार्य आहे.<br>२. इमारत भाडेतत्वावरील असल्यास अर्ज करावयाच्या वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरारनामा.<br>३. शैक्षणिक व प्रशासकीय इमारती मधील कक्षांचा तपशील(सोबतच्या परिशिष्ट-"क" मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br>३.१) प्राचार्य कक्ष<br>३.२) कार्यालय<br>३.३) इलेक्ट्रॉनिक्स/ संगणक प्रयोगशाळा<br>३.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>३.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>३.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>३.७) ग्रंथालय<br>३.८)महिला कक्ष<br>३.९) अभिलेख कक्ष<br>३.१०) नॅक रुम<br>३.११) कर्मचारी कक्ष<br>३.१२) सभागृह<br>३.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>३.१४) प्रसाधन गृह<br>३.१५) व्हरांडा<br>३.१६)राष्ट्रीय छात्र सेना कक्ष<br>३.१७) राष्ट्रीय सेवा योजना कक्ष<br>४. पाणी सुविधा (प्रस्ताव ज्यावर्षी दाखल केला जाईल त्या पुर्वीच्या लगतच्या वर्षातील स्थानिक प्राधिकरणाची पाणी पट्टी पावती) |

| | |
|---|---|
| | ५. वीज सुविधा (महाविद्यालयाचा अंतिम मान्यतेचा प्रस्ताव ज्या महिन्यात दाखल केला जाईल त्या पूर्वीच्या लगतच्या महिन्यातील वीज देयकाची प्रत)<br>६. ड्रेनेज सुविधा (ड्रेनेज सुविधा असल्याबाबत स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>७. वसतिगृह सुविधा (महाविद्यालयाच्या परिसरात २०% विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे संस्थेचे हमीपत्र) |
| ८. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत सेमिनार रुम, लेक्चर रुम, फॅकल्टी रुम, स्टाफ रुम, प्राचार्य कक्ष, कॉमन रुम, वसतीगृह इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर उपलब्ध असल्याबाबतचे संस्थेचे हमीपत्र |
| ९. | ७ मधील कक्षांसाठी फर्निचर खरेदी केल्याची अधिकृत पावती |
| १०. | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या विद्याशाखेशी संबंधित किमान ५०० पुस्तके खरेदी केल्याची अधिकृत पावती). |
| ११. | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित सामग्री करीता आवश्यक निधी राखीव ठेवला असल्याचे दर्शविणारे (इरादापत्र मंजूर झाल्याच्या दिनांकापासून ते अंतिम मान्यतेकरीता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापर्यंतचे) बँक स्टेटमेंट (विज्ञान विद्याशाखेसाठी किमान रु.१ लाख प्रत्येक विषयासाठी राखीव) व संस्थेचे हमीपत्र |
| १२. | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, उपहारगृह, आरोग्य सुविधा असल्याबाबतचे संस्थेचे हमीपत्र. |
| १३. | संबंधित संस्था प्रस्तावित महाविद्यालयाकरिता क्रीडांगण भाड्याने वापरणार असल्यास रु.५००/- च्या स्टॅंप पेपरवर नोंदणीकृत भाडेकराराची साक्षांकित प्रत. |
| १४. | महाविद्यालय भाडेतत्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्याठिकाणी स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणार असल्याबाबतचे हमीपत्र. |
| १५. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजूर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. ५००/- च्या स्टॅंप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. |
| १६. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>**अ)** मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत.<br>**ब)** अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत.<br>याबाबत संस्थेने सादर केलेले आणि संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाला मान्यता मिळाल्यास अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमण्यात येतील याबाबत संस्थेचे हमीपत्र. |
| १८. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अर्जदार संस्थेची सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये इरादापत्राच्या कालावधीत मूल्यांकन / पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र ठरली असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करून घेण्यासंदर्भातील तपशील. |
| ***संस्थेने द्यावयाचे सर्व हमीपत्र व साक्षांकित प्रती संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीने द्याव्यात.** | |

ASHOK SHANKAR MANDE Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT Date: 2025.09.18 12:08:06 +05'30'

**( अशोक मांडे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई-८४०७८३/मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

**"परिशिष्ट —क"**

**परिशिष्ट "ब" मधील अ.क्र. ७ साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ**

| अ.क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी /शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला,वाणिज्य , विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २० x २५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३० x २० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २० x ३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३० x ४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २० x १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २० x १५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १० x १५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १० x १५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २० x ३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४० x ३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १० x १५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ ) | | | १०२५० | ९२०० | ९५०० | १४००० | १२८०० | १७२०० | १७५०० | २०७५० |

* महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था / केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: CN = ASHOK SHANKAR MANDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.09.18 12:06:16 +05'30'

( अशोक मांडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" (NCPS - New College Permission System) द्वारे मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. एनजीसी-२०२५/ई-१३१९८७८/मशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
**दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५.**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६,
२) शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दिनांक १३.०९.२०१७.

**<u>प्रस्तावना</u> :**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (४) नुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांच्या मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष संदर्भाधिन क्र. २ येथील शासन निर्णय दिनांक १३.०९.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेले होते. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १.७ मध्ये विद्यापीठांनी ऑनलाईन प्रणालीमार्फत अर्ज स्विकारण्याबाबत नमूद केले आहे. त्यानुसार राज्यातील १२ अकृषी विद्यापीठांपैकी काही विद्यापीठांमध्ये नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी अर्ज स्विकारण्याबाबत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. परंतु, सदर विद्यापीठांमार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये एकसुत्रता दिसून येत नसल्याने, शासन स्तरावर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (NCPS - New College Permission System)" विकसित करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन

प्रणालीमध्ये संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय, दिनांक १३.०९.२०१७ मधील कार्यपद्धती व निकषांव्यतिरिक्त काही बाबी नव्याने समाविष्ट करण्यात आल्या असल्याने, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी सुधारित कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :

**शासन निर्णय:-**

**१.** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना मंजुरी देण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

**कार्यपद्धती :**

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०७ मधील तरतुदीनुसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आरखडा तयार करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानूसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीच्या (पारंपारिक व विधी) (AICTE, PCI व NCTE मंजुरी देत असलेले अभ्यासक्रम सोडून) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी सम्यक योजनेतील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. सम्यक योजनेच्या बाहेरील ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यास इच्छुक संस्थांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीद्वारे संबंधित विद्यापीठाकडे, ज्या वर्षापासून

परवानगी मागितली असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट “अ” मध्ये तसेच प्रणालीमध्ये नमुद केलेली कागदपत्रे सादर करावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन प्रणालीद्वारेच विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता विद्यापीठाचे कुलगुरू आवश्यक तेवढया छाननी समित्या नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी, सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये तसेच प्रणालीमध्ये नमुद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन छाननी समित्या त्यांचा अहवाल योग्य शिफारशींसह कुलगुरुंना सादर करतील.

१.१० संस्थेच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस/ अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पुर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या संबंधीच्या कागदपत्रांची छाननी समितीकडून तपासणी करण्यात येईल.

१.१३ प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करण्यासाठी कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ञ समित्या गठीत करतील. सदर तज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांचा अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीसाठी संबंधित संस्था सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये तसेच प्रणालीमध्ये विहित करण्यात आलेल्या सूचीनूसार आवश्यक बाबींची पूर्तता करतात किंवा कसे याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्यांचा अहवाल व्हिडीओ छायाचित्रणासह अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करतील. सदर पायाभुत सोयीसुविधा पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठाने करू नये.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ विद्यापीठामार्फत वरील सर्व कार्यवाही NCPS प्रणालीमार्फतच करण्यात येईल

१.१६ अपात्र ठरविण्यात आलेल्या संस्था त्याविरुध्द विद्यापीठाकडे ऑफलाईन पद्धतीने अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु ऑफलाईन पध्दतीने निर्णय देतील. सदर निर्णय विद्यापीठामार्फत प्रणालीवर अपलोड करण्यात येईल.

१.१७ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे प्रस्ताव मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट “अ” मध्ये आणि प्रणालीमध्ये नमूद कागदपत्रांसह विद्यापीठांकडून शासनाकडे दिनांक १ एप्रिल रोजी किंवा त्यापुर्वी प्रणालीमार्फत सादर करण्यात येतील.

१.१८ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावरील छाननीअंती पात्र ठरलेल्या प्रस्तावावर शासनाकडून १५ जूनपर्यंत अंतिम मान्यता कळविण्यात येईल.

१.१९ येथे स्पष्ट करण्यात येते की, इच्छुक संस्थांनी विद्यापीठाला प्रस्ताव सादर करणे व विद्यापीठांनी सदर प्रस्ताव छाननीअंती शासनास सादर करणे याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये जो कालमर्यादेचा दिनांक नमूद केला आहे, त्या दिनांकास सार्वजनिक/स्थानिक सुट्टी असल्यास त्याच्या पुढील कार्यालयीन दिवशीचा दिनांक हा अंतिम दिनांक असेल.

१.२० वरील परि. १.८ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१३ मध्ये विहित केलेली तज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व अतिरिक्त तुकडी वाढ यांची व्याप्ती विचारात घेवून ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

**२.** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी यांना मंजूरी देण्यासाठी पुढे विहीत केलेल्या निकषांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**निकष :**

२.१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विद्यापीठ नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठीचे उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा अर्ज, जर, -

(क) ते, अधिस्विकृती अधिकरणांच्या (NAAC) मानांकनानुसार अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुद्धा, एकतर राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून (NBA) अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसतील; आणि

(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करीत नसतील तर, राज्य शासनाकडे पाठविणार नाही.

त्याचप्रमाणे, ज्यांची यापूर्वीच महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पुर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

अ) ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांसहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर,

ब) यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ, ब, क ची तसेच प्रणालीमध्ये नमूद बाबींची पुर्तता करत नसतील तर.

२.२. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्यांची मान्यता ही कायम विनाअनुदानित तत्वावर राहील.

२.३. नवीन पाठ्यक्रमाची शिफारस करताना अशा अभ्यासक्रमास शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळ यांची मान्यता आवश्यक असल्यास त्यांच्या मान्यतेशिवाय असा पाठ्यक्रम शासनास शिफारशीत करण्यात येऊ नये.

२.४ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या महाविद्यालयामध्ये अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांना शासन मान्यता आहे, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मुलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत, याची खातरजमा केल्यानंतरच प्रस्ताव शिफारशीत केले जावेत.

२.५ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्या वाढीव अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडीकरीता शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार वाढीव भौतिक व मुलभूत सुविधा उपलब्ध असल्याची प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक असून विद्यापीठाने ही बाब प्रमाणित करावी.

२.६ ज्या महाविद्यालयाकरीता नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी प्रस्तावित करण्यात आलेली आहे, त्याकरीता विहित निकषांप्रमाणे नियमित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त केले असल्याचे प्रमाणपत्र विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी पुढील ०६ महिन्यांमध्ये शासनास सादर करावे.

**३.** विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी असे वर्गीकरण केलेले असावे.

४. विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना प्रस्ताव विहित केलेल्या निकषांची पुर्तता करीत असल्याची खात्री करावी. यापुर्वी विद्यापीठांनी प्रस्ताव पाठविताना विहित निकषांची पुर्तता नसतानासुद्धा प्रस्ताव शासनस्तरावर शिफारशीत केलेले आहेत. त्यामुळे अशा शिफारस केलेल्या प्रकरणी शासनास नाहक न्यायालयीन प्रकरणास सामोरे जावे लागले आहे. तेव्हा, विहित निकषांची पुर्तता करीत नसताना प्रस्ताव शासनास सादर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळ यांची राहील.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१८१४४७२७२७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33EBAF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.09.18 14:48:15 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
९. सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
१०. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई,
११. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
१३. सर्व सहसचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१५. कार्यासन अधिकारी (विशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (मशि-४).

१२. **नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाची जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे :**

**१)** नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालकरिता दर्शविलेली जागा कोणत्या क्षेत्रात आहे, त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (महानगरपालिका- क्षेत्रासाठी सहाय्यक आयुक्त/वॉर्ड ऑफिसर; नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या क्षेत्रासाठी मुख्याधिकारी;ग्रामपंचायत क्षेत्रासाठी ग्रामसेवक)

**२.१) <u>स्वत:ची जागा</u> —**

"अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)

"अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)

"ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)

"ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)

उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत. (उदा. गाव नमूना नं ७/१२, मालमत्ता पत्रक)

**२.२) <u>भाड्याची जागा</u> - (किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**

"अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.

"अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.

"ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.

"ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान २ एकर अकृषक जागा.

उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - १३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट - अ"

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | संस्थेचा तपशील |
| २. | विस्तारीकरणांतर्गत अर्ज करण्यासाठी अर्जदारास प्राधिकृत केल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्राधिकृत केलेल्या अर्जदाराचा तपशील. |
| ३. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| ४. | नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाचा अंतिम मान्यतेबाबतचा शासन निर्णय. |
| ५. | संस्थेच्या चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची साक्षांकित प्रत. |
| ६. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची सनदी लेखापाल (Chartered Accountant) यांनी प्रमाणित केलेली प्रत |
| ७. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. (संस्थेचे नाव ,बँकेचे नाव व बँकेचा IFSC CODE दर्शवणारे कागदपत्र, उदा. बँक बॅलन्स स्टेटमेंट, पासबुक चे प्रथम पृष्ठ व अंतिम पृष्ठ) |
| ८. | प्रस्ताव ज्या शैक्षणिक वर्षासाठी दाखल केला आहे, त्या शैक्षणिक वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष मुदतीच्या मुदत ठेव पावतीची (Fix Deposit) प्रमाणित प्रत<br>नवीन अभ्यास पाठ्यक्रम - रु. ५.०० लाख<br>विषय - रु. २.०० लाख<br>विद्याशाखा - रु. ५.०० लाख<br>अतिरिक्त तुकडी - रु. ३.०० लाख |
| ९. | संबंधित राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेत ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पुर्व परवानगीशिवाय न काढणेबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र.<br>(बँकेच्या लेटर हेड वर ) |
| १०. | शासनाचे कायम विनाअनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. ५००/- च्या स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. |
| ११. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय/शाळा अस्तित्वात असेल तर, कनिष्ठ महाविद्यालय/शाळेच्या अस्तित्वात असलेल्या इमारतीचा वापर वरिष्ठ महाविद्यालयातील प्रस्तावित नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी या करीता केला जाणार नाही, असे हमीपत्र |

| | |
|---|---|
| | उपरोक्त "अ","ब","क","ड",“इ” मधील नोंदणीकृत कराराच्या अनुषंगाने (भाडेकरारातील जमीन ही जमीन मालकाच्या नावावर असल्याचे प्रमाणित कागदपत्र उदा. गाव नमुना नं ७/१२ अथवा मालमत्ता पत्रक)<br><br>३. प्रस्तुत महाविद्यालयाची जमीन (संस्थेची स्वत:ची किंवा भाडेतत्त्वावरील) अकृषक असल्यासंदर्भातील महसूल विभागाचे आदेश / गावठाण जमिनीसंदर्भात महसूल व वनविभागाच्या दिनांक १३.०४.२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार अकृषक सनद. |
| १३. | **महाविद्यालयाच्या इमारतीचा तपशील-**<br>१. नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाचे आहे, त्या महाविद्यालयाची इमारत (संस्थेची/भाडेतत्त्वावरील) संबंधित स्थानिक स्वराज संस्था किंवा अन्य संबंधित प्राधिकरणाचे इमारत बांधकाम पुर्णत्वाबाबतचे प्रमाणपत्र, ज्यामध्ये इमारतीचे क्षेत्रफळ चौ.फु./चौ.मी., गट/सर्वे नंबर आणि ज्याभागातील इमारत आहे त्याबाबतचा तपशील नमूद असणे अनिवार्य आहे.<br><br>२. इमारत भाडेतत्वावरील असल्यास अर्ज करावयाच्या वर्षापासून पुढील किमान ५ वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेकरारनामा<br><br>३. शैक्षणिक व प्रशासकीय इमारती मधील कक्षांचा तपशील (सोबतच्या परिशिष्ट-“ड” मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br>३.१) प्राचार्य कक्ष<br>३.२) कार्यालय<br>३.३) इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा<br>३.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>३.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>३.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>३.७) ग्रंथालय<br>३.८)महिला कक्ष<br>३.९) अभिलेख कक्ष<br>३.१०) नॅक कक्ष<br>३.११) कर्मचारी कक्ष<br>३.१२) सभागृह<br>३.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>३.१४) स्वछतागृह (२० विद्यार्थ्यामागे १ स्वछतागृह महिलांसाठी स्वतंत्र स्वछतागृह व प्रसाधने )<br>३.१५) व्हरांडा<br>३.१६)राष्ट्रीय छात्र सेना कक्ष |

| | |
|---|---|
| | ३.१७) राष्ट्रीय सेवा योजना कक्ष<br>४. पाणी सुविधा (प्रस्ताव ज्या वर्षी दाखल केला जाईल त्या पूर्वीच्या वर्षातील स्थानिक प्राधिकरणाची पाणी पट्टी पावती)<br>५. वीज सुविधा (प्रस्ताव ज्या महिन्यात दाखल केला जाईल त्या पूर्वीच्या महिन्यातील वीज देयकाची प्रत)<br>६. ड्रेनेज सुविधा (ड्रेनेज सुविधा असल्याबाबत स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>७. वसतिगृह सुविधा (महाविद्यालयाच्या परिसरात २०% विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असल्याचे संस्थेचे हमीपत्र) |
| १४. | अनुक्रमांक १३ येथे विहित केलेल्या कक्ष / रूम करीता फर्निचरसाठी किमान रु. ५.०० लक्ष शिल्लक असल्याबाबतचा पुरावा. |
| १५. | जो पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरु करावयाचा आहे. त्यासंदर्भातील पुस्तकांची ग्रंथालयात सुविधा (किमान १०० पुस्तके प्रत्यक्षात हवीत) |
| १६. | महाविद्यालय भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षांमध्ये महाविद्यालय ज्या स्थळबिंदूसाठी मंजूर झाले आहे त्याठिकाणी स्वतःच्या इमारतीमध्ये स्थलांतरित करणार असल्याबाबतचे हमीपत्र |
| १७. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील कलम १०९(६) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ज्या संस्थेचे यापुर्वीचे महाविद्यालय अस्तित्वात आहे, अशा संस्थेने नविन महाविद्यालयाची मागणी केल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक/एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B1010 8672887AB7D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.09.18 14:49:39 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - १३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट- ब"

**पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष.**

| अ.क्र. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | हा विषय सुरू करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे. |
| २. | सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरू झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच पास असणे आवश्यक आहे. |
| ३. | महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन "अ" श्रेणीचे असणे आवश्यक आहे. |
| ४. | सदर महाविद्यालयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे. |
| ५. | या महाविद्यालयात बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे. |
| ६. | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |
| ७. | पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत. |
| ८. | विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी विषयाचा अधिव्याख्याता पूर्णवेळ पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी. केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल. |
| ९. | सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा पाहिजेत. |
| १०. | विषय सुरू ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f025c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA826 59B1010867 2887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.09.18 14:48:50 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - १३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे**

## "परिशिष्ट- क"

**<u>पदव्युत्तर स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यासाठी आवश्यक निकष.</u>**

| अ.क. | तपासणी सूची |
|---|---|
| १. | मागणी केलेल्या महाविद्यालयात बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे. |
| २. | सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान "अ" श्रेणी असले पाहिजे. |
| ३. | विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे. |
| ४. | बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असला पाहिजे. |
| ५. | तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. |
| ६. | दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे. |
| ७. | किमान ६०० वर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात. |
| ८. | भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.09.18 14:49:02 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२५/ ई - १३१९८७८ /मशि-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ सोबतचे.**

## "परिशिष्ट- ड"

### परिशिष्ट अ मधील अ.क्र. १३ साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ.क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला, वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०*२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०*२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०*३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
| ४) | रसायनशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ५) | पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ६) | जिवशास्त्र प्रयोगशाळा | १ | ३०*४० | १२०० | -- | -- | १२०० | -- | १२०० | १२०० | १२०० |
| ७) | ग्रंथालय | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ८) | एनसीसी रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| ९) | एन.एस.एस.रुम | १ | २०*१५ | ३०० | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) | ३००(०) |
| १०) | लेडीज रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ११) | रेकॉर्ड रुम | १ | १०*१५ | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| १२) | नॅक रूम | १ | १०*१५ | १५० | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) | १५०(०) |
| १३) | स्टाफ रूम | १ | २०*३० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १४) | सभागृह | १ | ४०*३० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| १५) | मोठे व्याख्यान कक्ष | ३/६/९ | | ९०० | २७०० | २७०० | २७०० | ५४०० | ५४०० | ५४०० | ८१०० |
| १६) | टॉयलेट ब्लॉक | ४ | १०*१५ | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| १७) | व्हरांडा | १ | किमान ५ फुट रुंद | | २१०० | २४०० | ३३०० | ३००० | ३८०० | ४१०० | ४६५० |
| | एकूण (किमान आवश्यक क्षेत्रफळ) | | | **१०२५०** | **९२००** | **९५००** | **१४०००** | **१२८००** | **१७२००** | **१७५००** | **२०७५०** |

*** महाविद्यालयासाठी स्वतंत्र शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे असल्यास अशा शिखर संस्था/ केंद्रिय नियामक मंडळाच्या नियमानुसार त्यांनी विहित केलेल्या आवश्यक भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांचे निकष त्यांना लागू राहतील.**

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2025.09.18 14:49:17 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : vishi५.hted-mh@mah.gov.in

क्र. संकीर्ण- २०२५/ई-१३१७१५३/विशि-५ दिनांक: १९ /०९/२०२५

प्रति,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : अकृषी विद्यापीठाच्या सन २०२६-२७ या वर्षाच्या बृहत आराखड्याबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७६ मधील तरतुदीस अनुसरून, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजी पार पडली. या बैठकीतील मान्यतेनुसार सन २०२६-२७ या वर्षाकरीता विद्यापीठनिहाय नवीन महाविद्यालयासाठीचे मंजूर स्थळबिंदू निदर्शकांची विवरणपत्रे सोबत जोडली आहेत.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या विवरण पत्रातील नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी मंजूर स्थळबिंदूना आवश्यकतेनुसार, विद्यापीठ प्राधिकरणांची मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार जाहिरात देऊन प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३. पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये या बार कॉन्सील ऑफ इंडिया यांच्या दि. १३/०८/२०२५ रोजीच्या प्रेस रिलीजच्या अनुषंगाने **नवीन विधी महाविद्यालय सुरू करण्याच्या बाबत बार कौन्सिल ऑफ इंडियाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC)** सादर करणा-या संस्थांचेच प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(३)(ग) नुसार स्वीकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरात देताना नमूद करावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठ्यक्रम/ विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने New College Permission System (NCPS) ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. सदर प्रणालीची लिंक https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ अशी असून, शैक्षणिक वर्ष

२०२६-२०२७ करीता या प्रणालीव्दारे संस्थेने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत तसेच ऑफलाईन प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नसल्याच्या सूचना विद्यापीठाच्या जाहीरातीमध्ये नमूद करण्यात याव्यात.

आपला,

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत - स्थळबिंदू यादी

प्रत - कक्ष अधिकारी, मशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

## Perspective Plan - New Locations for 2026-2027

## Shivaji University, Kolhapur

| District | Taluka | Location | General ACS Count | General ACS Programs | Night College ACS Count | Night College ACS Programs | Womens College ACS Count | Womens College ACS Programs | Law Count | Law Programs | Social Work Count | Social Work Programs | Total Count | Total Programs |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Kolhapur | panhala | Bajar-Bhogav | 1 | B.A. | | | | | | | | | 1 | 1 |
| | Hatkanangale | Pethwadgaon | | | | | | | 1 | L.L.B. Three Years | | | 1 | 1 |
| Sangli | Tasgaon | Tasgaon | | | 1 | B.A | | | | | | | 1 | 1 |
| Sangli | Khanapur | Vita | | | | | | | 1 | L.L.B. Three Years | | | 1 | 1 |
| | | | | | | | | | 0 | L.L.B. Five Years | | | 0 | 1 |
| Satara | satara | satara city | | | | | | | 1 | L.L.B. Three Years | | | 1 | 1 |
| Satara | Satara | Satara | | | 1 | B.A | | | | | | | 1 | 1 |
| | | | 1 | 1 | 2 | 2 | 0 | 0 | 3 | 4 | 0 | 0 | 6 | 7 |

Abbrivations-

ACS - Arts Commerce Science

प्रताप पां. लुबाळ
उप सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
कक्ष क्रमांक ४१८, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID: -mashi4-hted@mah.gov.in

---

क्रमांक :- **HTED-११०१०/२७/८४०७८३/२०२४/MHT(HE-४)** दिनांक:- १९ सप्टेंबर, २०२५.

प्रति,
कुलगुरू,
सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.
(कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक विद्यापीठ वगळून)

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन तुकडी/विद्याशाखा/अभ्यासक्रम यांचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फत शासनास सादर करणेबाबत.

संदर्भ:- शासन पत्र क्र. संकीर्ण--२०२५/ई --१३१७१५३/विशि-५ दिनांक - १९.०९.२०२५.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७६ मधील तरतूदीस अनुसरून महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यापीठनिहाय नवीन महाविद्यालयासाठीचे मंजूर स्थळबिंदू आपणांस कळविण्यात आले आहेत. सदर मंजूर स्थळ

बिंदूना आवश्यकतेनुसार विद्यापीठ प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी आणि त्यानुसार प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

२. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम/ विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" [(New College Permission System (NCPS)] ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून, या प्रणालीव्दारे संस्थेने विद्यापीठाकडे प्रस्ताव

सादर करणेबाबत तसेच विद्यापीठाकडून ऑफलाईन प्रस्ताव स्विकारण्यात येणार नसल्याच्या सूचना विद्यापीठाच्या जाहिरातीमध्ये नमूद करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

३. त्यानुसार, शासनास नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम/ विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी NCPS या ऑनलाईन प्रणालीची खालील लिंक आपणास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/

४. संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता माहेडने दिलेल्या मान्यतेनुसार नवीन महाविद्यालयासंबंधीचे स्थळबिंदू तसेच विस्तारीकरणाबाबतची माहिती सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये भरण्याची कार्यवाही करावी. तद्नंतरच सदर प्रणालीची लिंक अर्ज करण्याकरीता संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावी.

५. त्याचप्रमाणे, येथे आपणास कळविण्यात येते की, बार काउन्सिल ऑफ इंडियाने त्यांच्या दिनांक १३.०८.२०२५ रोजीच्या प्रेस रिलिजनुसार, पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सबब, विस्तारीकरणांतर्गत "विधी" संदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, २०१६ च्या कलम १०९ (४) (ग) नुसार स्विकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरातीत नमूद करावी.

जपवार
(जयश्री पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन